पुढारी




पिंपरी येथील. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ प्रेक्षागृहात १८ व्या जागतिक मराठी संमेलनाच्या उद्घाटन समारंभात प्राज उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी यांना 'जागतिक मराठी भूषण' पुरस्कार या संमेलनाचे उद्घाटक राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, याप्रसंगी डावीकडून श्रीनिवास पाटील, संमेलनाचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर मुळे, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, सत्कारमूर्ती डॉ. प्रमोद चौधरी, संमेलनाचे उद्घाटक खा. शरद पवार आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती व या संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी.पाटील.

Pimpri Edition
Jan 8, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

महाराष्ट्र टाइम्स

# करोनाची तिसरी लाट नाही

## डॉ. रवी गोडसे यांचे आश्वासन




**मराठी संमेलनात 'जागतिक आरोग्यव्यवस्था आणि भारत' या चर्चासत्रात डावीकडून संवादक डॉ. शंतनू अभ्यंकर, डॉ. रवी गोडसे, डॉ. रमण गंगाखेडकर, डॉ. मकरंद जावडेकर, डॉ. श्रीकांत चिंचाळकर.**

**म. टा. प्रतिनिधी,** पिंपरी

'येत्या आठ-दहा दिवसांत करोनाच्या संदर्भात चीनमधून अनेक बातम्या येतील. मात्र, या बातम्यांमुळे घाबरून जाऊ नका. आपल्या देशात करोनाची तिसरी लाट येणार नाही, हा माझा विश्वास आहे; तरीही आपण आवश्यक ती काळजी घ्यावी,' असे आवाहन डॉ. रवी गोडसे यांनी पिंपरी येथे केले.

जागतिक मराठी अकादमी आणि डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठ, पिंपरी यांच्या वतीने १८व्या जागतिक मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशीच्या चौथ्या सत्रात 'जागतिक आरोग्यव्यवस्था आणि भारत' हे चर्चासत्र पार पडले. त्या वेळी डॉ. रवी गोडसे (अमेरिका) बोलत होते. या चर्चासत्रात डॉ. रमण गंगाखेडकर (कॅनडा), डॉ. मकरंद जावडेकर (अमेरिका), डॉ. श्रीकांत चिंचाळकर (कॅनडा) यांनी सहभाग घेतला.

'आपल्याकडील एमबीबीएस अभ्यासक्रम उत्कृष्ट असून, येथील डॉक्टर परदेशात चांगली सेवा देऊ शकतात. येत्या काळात कमी किमतीच्या उत्पादनांची संख्या वाढेल,' असेही डॉ. गोडसे म्हणाले.

या वेळी डॉ. शंतनू अभ्यंकर यांनी सर्व डॉक्टरांशी संवाद साधला. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती आणि संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील आणि संमेलनाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या हस्ते सर्व उपस्थितांना सन्मानित करण्यात आले.

### 'माझ्या पेशंटमुळेच हा सन्मान'

'कोणत्याही पुरस्काराची अपेक्षा न ठेवता मी वैद्यकीय क्षेत्रात काम करत राहिलो. ज्यांना आपण सोशली चॅलेंज्ड म्हणतो, त्यांनी त्यांची खरी ताकद मला पद्मश्री सन्मान मिळण्याकरिता लावली. भारताला पहिली महाशक्ती करण्यासाठी सर्वांनी मोठी स्वप्ने पाहायला हवीत,' असे आवाहन डॉ. रमण गंगाखेडकर यांनी केले.

# रुग्णाबरोबरचा संवाद महत्त्वाचा :डॉ. रवी गोडसे

पिंपरी, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. रुग्णांच्या बरोबर होणारा संवाद हा सहजरित्या आणि आपुलकीचा झाला तर रुग्ण लवकर बरा होण्यास मदत होते असे डॉ रवी गोडसे (अमेरिका) यांनी सांगितले. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठातील मेडिकल शाखेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

व्यासपीठावर अधिष्ठाता जे एस भावलकर आणि संचालिका वत्सला स्वामी होत्या. डॉ. गोडसे (अमेरिका) यांचा परिचय डॉ. भावळकर यांनी करुन दिला. डॉ. गोडसे यांनी सांगितले की, मेडिकल शाखेकडून सर्वांच्या अपेक्षा वाढत आहेत. त्या पूर्ण करण्याची जबाबदारी आपली आहे. रुग्णांना समजावून घेणे गरजेचे आहे. तसेच त्यांचे आजार लक्षात घेऊन योग्य उपचार करायला हवे. तसेच योग्य ती माहिती त्यांना देणे आवश्यकच आहे असे ते म्हणाले. यावेळी उपस्थित केलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे डॉ. गोडसे यांनी दिली. संचालिका स्वामी यांनी आभार मानले.

पुढारी

# कोरोनाची तिसरी लाट येणार नाही : डॉ. रवी गोडसे

पिंपरी : पुढारी वृत्तसेवा

येत्या काही दिवसांत कोरोनाच्या संदर्भात चीनमधून अनेक बातम्या येतील. मात्र या बातम्यांमुळे घाबरू नका. कारण आपल्या देशात कोरोनाची तिसरी लाट येणार नाही, असा माझा विश्वास आहे. तरीही आपण योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन डॉ. रवी गोडसे यांनी पिंपरी येथे केले.

जागतिक मराठी अकादमी आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी यांच्या वतीने १८ व्या जागतिक मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशीच्या चौथ्या सत्रात 'जागतिक आरोग्यव्यवस्था आणि भारत' हे चर्चासत्र पार पडले. त्या वेळी मूळचे भारतीय असलेल्या परदेशस्थ डॉक्टरांची उपस्थिती होती. त्या वेळी डॉ. रवी गोडसे बोलत होते. याप्रसंगी पद्मश्री डॉ. रमण गंगाखेडकर (कॅनडा), डॉ. मकरंद जावडेकर (अमेरिका), डॉ. श्रीकांत चिंचाळकर (कॅनडा) आदी उपस्थित होते. डॉ. शंतनु अभ्यंकर यांनी सहभागी डॉक्टरांशी संवाद साधला.

डॉ. गोडसे म्हणाले की, आपल्याकडचे वैद्यकीय अभ्यासक्रम खरेच उत्कृष्ट आहेत. त्यामुळे आपल्या देशातील डॉक्टर परदेशात चांगली सेवा देऊ शकतात. आपल्या देशातील लोकांचा सेवाभाव परदेशातील लोकांना भावतो. आपल्या देशाची आर्थिक परिस्थिती येत्या काळात सुधारणार आहे. येत्या काळात कमी किमतीची उत्पादनांची संख्या वाढेल असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.

डॉ. गंगाखेडकर यांनी 'कोरोना' विषाणू बाबत सांगितले की, जेव्हा 'एचआयव्ही' आला तेव्हा त्याबद्दल लोक हा कसा उत्पन्न झाला, असे विचारायचे. तेव्हा आम्ही त्यांना म्हणायचो की, हा प्रश्न विचारण्यापेक्षा हा विषाणू आहे हे स्वीकारा. त्याचा डीएनए शोधत बसू नका, तर तुम्हाला त्याच्याशी लढायचे आहे, हे लक्षात ठेवा. चीनने वर्षानुवर्षे जग त्रस्त करून सोडले. एवढी स्वत:ची ताकद वाढवली आहे. आपण बरेच वर्ष त्यांना पाहात राहणार आहोत अशी परिस्थिती आहे. त्यामुळे चिनी वस्तू कमी कालावधीच्या असतीलच असे नाही.

डॉ. गोडसे यांनी त्यांच्या कोरोनाकाळातील व्हिडीओबाबत बरेच गमतीदार अनुभव सांगितले व म्हणाले की, मला कळत नाही मराठी माणसाच्या महत्त्वाकांक्षेला काय झाले आहे. त्यांना स्वप्न पडतात ते पण गोणपाटातले. आपण आपल्या पात्रतेप्रमाणे राहूया आणि तसे वागूया. आपण गरिबांसारखे बोलतो ते आवडत नाही. आपण मोठा विचार आणि स्वप्न उरी बाळगायला हवी, असे मत त्यांनी व्यक्त केले. डॉ. शंतनु अभ्यंकर यांनी सर्व डॉक्टरांशी संवाद साधला. डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती आणि संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील आणि संमेलनाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या हस्ते उपस्थितांना सन्मानित करण्यात आले.

## माझ्या रुग्णांमुळेच पद्मश्री सन्मान : डॉ. गंगाखेडकर

भारत देशाला पाचवी महाशक्ती म्हटले जाते. देशाला पहिल्या महाशक्तीपर्यंत न्यायचे असेल, तर आपण सर्वांनी मोठी स्वप्ने पाहायला हवीत आणि त्यासाठी स्वत:वर विश्वास ठेवा. मी वैद्यकीय क्षेत्रात काम करत राहिलो; मात्र कोणत्याही पुरस्काराची अपेक्षा वा त्यासाठी प्रयत्न केले नाही. माझ्या एका रुग्णाने जन्मतारीख विचारली तेव्हा मला आश्चर्य वाटले. तेव्हा त्यांनी मला सांगितले की तुम्हाला पद्मश्री सन्मान मिळेपर्यंत आम्ही प्रयत्न करणार आहे. त्यांच्या या पाठपुराव्यामुळेच हा पद्मश्री सन्मान मिळाला. ज्यांना आपण सोशली चॅलेंज्ड म्हणतो, त्यांनी त्यांची खरी ताकद मला हा सन्मान मिळण्यासाठी लावली. असे मत पद्मश्री डॉ. रमण गंगाखेडकर यांनी केले.




जागतिक मराठी अकादमी आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी यांच्या वतीने १८ व्या जागतिक मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनात 'जागतिक आरोग्यव्यवस्था आणि भारत' हे चर्चासत्र पार पडले. याप्रसंगी डॉ. रवी गोडसे, डॉ. रमण गंगाखेडकर, डॉ. मकरंद जावडेकर, डॉ. श्रीकांत चिंचाळकर आदींनी सहभाग घेतला. डॉ. शंतनु अभ्यंकर यांनी सहभागी डॉक्टरांशी संवाद साधला.

# ‘मराठी तरुणांनी व्यवसायात उतरण्याचे धाडस दाखवावे’

## १८ व्या जागतिक मराठी संमेलनाचा समारोप

**डॉ. पी. डी. पाटील यांचा विशेष सन्मान**

पिंपरीमध्ये १८ व्या जागतिक मराठी संमेलनाचे आयोजन करून हे संमेलन यशस्वी केल्याबद्दल डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती व संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी.पाटील यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

**राज्य सरकारकडून लवकरच पोर्टल**

देशभरात मराठी संस्कृती व मराठीच्या ज्या पाऊलखुणा उमटल्या आहेत त्याचे संवर्धन व जतन करण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने लवकरच एक पोर्टल सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिकमंत्री मुनगंटीवार यांनी केली.

**पिंपरी : पुढारी वृत्तसेवा**

मराठा आरक्षणाला मंजुरी मिळाल्यास आठ लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या गटातील नागरिकांना त्याचा फायदा मिळणार आहे. राज्यामध्ये दरवर्षी १० ते २० हजार नोकऱ्या निर्माण होतात. आम्ही यंदा ७५ हजार नोकऱ्यांचे आव्हान स्वीकारले आहे. मराठी तरुणांनी केवळ नोकऱ्यांवर विसंबून न राहता व्यवसायात उतरण्याचे धाडस वाढवायला हवे.

मराठी माणसाच्या मनातील न्यूनगंड आपल्याला घालवावा लागेल, असे मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी रविवारी (दि. ८) व्यक्त केले.

जागतिक मराठी अकादमी आणि पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने ‘शोध मराठी मनाचा - २०२३’ या विषयावरील १८ व्या जागतिक मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. तीन दिवस चाललेल्या या संमेलनाचा रविवारी समारोप झाला. त्या प्रसंगी श्री. पाटील बोलत होते. राज्याचे सांस्कृतिकमंत्री सुधीर मुनगंटीवार, माजी केंद्रीयमंत्री रमाकांत खलप, गोव्याचे सांस्कृतिकमंत्री गोविंद गावडे, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य तथा संमेलनाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर मुळे, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती तथा स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील, आदी उपस्थित होते.

या प्रसंगी विद्यापीठाचे सेक्रेटरी डॉ. सोमनाथ पाटील, विश्वस्त आणि खजिनदार डॉ. यशराज पाटील, जागतिक मराठी अकादमीचे अध्यक्ष तथा कवी रामदास फुटाणे, संमेलनाचे कार्यवाह सुनील महाजन, गौरव फुटाणे, रवींद्र डोमाळे, श्रीकांत कदम, प्रशांत पवार, सुदाम भोरे, सचिन ईटकर आदींचा सत्कार करण्यात आला. पाटील म्हणाले की, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये मराठी टक्का वाढविण्यासाठी आयएएस ट्रेनिंग सेंटर व्हायला हवे. मराठी विद्यार्थी नोकरी किंवा व्यवसायाच्या संधी अन्य राज्यात मिळत असतील तर तेथे जायला तयार नसतात. व्यवसायात धाडस केल्यामुळे मी गावाकडे काजूचा कारखाना सुरू करू शकलो. मराठी तरुणांनी व्यवसायात पुढे यायला हवे.

**मराठीला ऐतिहासिक वारसा :**

मराठी भाषा ही ऐतिहासिक वारसा सांगणारी, अध्यात्म सांगणारी भाषा आहे. जगातील बोलीभाषांमध्ये आपली भाषा दहाव्या क्रमांकाची आहे. या भाषेला दर्जा मिळवून देण्यासाठी चिंतन गरजेचे आहे, असे मत राज्याचे सांस्कृतिकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केले. राज्याच्या वैभवाची ठिकाणे देशभरात असल्याने ती एकत्र मांडण्यासाठी तरुण इतिहासकारांची सूची बनविणे आवश्यक आहे. देशात जिथे मराठीची स्मारके आहेत, तिथे फलक उभारण्यात यावे. विदेशात ३ कोटी २० लाख भारतीय नोकरी-व्यवसायात असल्याने त्यांचा उपयोग महाराष्ट्राच्या विकासासाठी करण्यात यावा. दिल्लीत प्रशासकीय अधिकारी बनण्यासाठी आलेल्या राज्यातील १० हजार मराठी मुलांसाठी दिल्लीत संकुल उभारण्यात यावे. अशा मागण्या संमेलनाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी केल्या.




पिंपरी येथील १८ व्या जागतिक मराठी संमेलनात स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी.पाटील यांचा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. या वेळी (डावीकडून) डॉ. ज्ञानेश्वर मुळे, सुधीर मुनगंटीवार, गोविंद गावडे, सचिन इटकर, रामदास फुटाणे, सोमनाथ पाटील, यशराज पाटील.

सकाळ




**डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी :** जागतिक मराठी संमेलन समारोप कार्यक्रमात रविवारी स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील यांचा सत्कार करताना चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, गोविंद गावडे. यावेळी (डावीकडून) संदीप दीक्षित, डॉ. ज्ञानेश्वर मुळे, पाटील, मुनगंटीवार, पाटील, गावडे, सचिन इटकर, रामदास फुटाणे व डॉ. सोमनाथ पाटील.

# मराठी जगभर पोचविण्यासाठी पोर्टल उभे

## सांस्कृतिक मंत्री मुनगंटीवार यांची घोषणा; जागतिक मराठी संमेलनाचा समारोप

**पिंपरी, ता. ८ :** "जगातील बोली भाषांमध्ये मराठी दहाव्या क्रमांकावर आहे. सांस्कृतिक शक्ती, ऐतिहासिक वारसा सांगणारी, प्रचंड वाङ्‌मय, अध्यात्म देणारी भाषा आहे. मराठीची ही शक्ती विश्वकल्याणासाठी आहे. ही ज्ञानाची भाषा व्हावी. मराठीच्या श्रेष्ठत्त्वासाठी, जगभरात पोहोचण्यासाठी राज्य सरकार लवकरच पोर्टल उभे करणार आहे," अशी घोषणा राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी रविवारी (ता. ८) पिंपरीत केली.

जागतिक मराठी अकादमी आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ आयोजित 'शोध मराठी मनाचा मनाचा २०२३' या १८ व्या जागतिक मराठी साहित्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी मुनगंटीवार बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, गोव्याचे सांस्कृतिक मंत्री गोविंद गावडे, माजी केंद्रीय कायदामंत्री रमाकांत खलप, संमेलनाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर मुळे, स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील, अकादमीचे अध्यक्ष रामदास फुटाणे, उपाध्यक्ष गिरीश गांधी, अमेरिकेतील बृहंमहाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष संदीप दीक्षित, डॉ. सोमनाथ पाटील, डॉ. यशराज पाटील उपस्थित होते.

मुनगंटीवार म्हणाले, "जगातील हजारो भाषा नष्ट होण्याची भीती व्यक्त केली जाते. केवळ दोनशे ते तीनशे भाषा राहतील, असे बोलले जात आहे. त्यामुळे 'स्टोरी टेल'प्रमाणे 'महाराष्ट्र टेल' ॲप बनविण्याचा विचार आम्ही केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाला २०२४ मध्ये ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यांना राजमाता जिजाऊ यांनी राज्यभिषेकाचे महत्त्व समजावून सांगितले. ते सांस्कृतिक विभागातील पोर्टलवर घेणार आहोत. मराठीच्या संवर्धनासाठी सरकार पाठीशी राहील."

पाटील म्हणाले, "मराठी माणूस देशात व जगात कसा पुढे जाईल यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. जिल्हा पातळीवर 'प्री आयएएस ट्रेनिंग सेंटर' सुरू केले आहेत. दिल्लीत युपीएससीची तयारी करणाऱ्या मराठी मुलांना शिष्यवृत्ती देतो आहे. मराठी माणूस शिक्षणानंतर नोकरीतच अडकतो. धंदा-व्यावसायात कमी असतो. तालुक्याच्या बाहेर जायलाही काही जण नको म्हणतात. देशात, जगात मराठी टक्का वाढवायचा असेल तर धाडस केले पाहिजे. मराठी माणूस पुढे जाण्यासाठी पाठिंबा देण्याची व्यवस्था केली पाहिजे."

गावडे म्हणाले, "जीवनात पुढे जायचे असेल तर मातृभाषा खूप महत्त्वाची आहे. भाषेमुळे माणूस जगाला समजू लागला. माणसाने जेवढ्या भाषा येतील तेवढ्या शिकाव्यात. मात्र, मन, डोळे मातृभाषेलाच जोडलेले असावेत. गोव्यातील फर्मागढी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या किल्ल्यांचा इतिहास चित्रफितीच्या माध्यमातून मांडण्याचा आमचा विचार आहे. मराठी पाऊल पुढे पडावे हाच आमचा मानस आहे." सूत्रसंचालक स्नेहल दामले यांनी केले. सचिन इटकर यांनी आभार मानले.

> "जगात तीन कोटी वीस लाख भारतीय आहेत. दहा लाख मराठी लोक विविध देशांत आहेत. त्यांच्यासाठी आपण काही तरी केले पाहिजे. भारतभर पसरलेल्या महाराष्ट्राच्या, मराठीच्या खुणा ग्वाल्हेर, इंदौर, अटक ते कटक, तंजावर आदी शहरांत आहेत. याची यादी करून त्या स्मारकांची माहिती नवीन पिढीला द्यावी. देशाला वैचारिक परंपरा देण्याची गरज आहे. देशात विविध ठिकाणची मराठी मंडळे बरखास्त होऊ लागली आहेत, अशा संस्थांना सरकारने मदत करावी. दिल्लीत दहा हजार मराठी मुले-मुली यूपीएससी परीक्षेच्या तयारीसाठी येतात. त्यांच्यासाठी वसतिगृह, नॉलेज संकुल उभे करावेत.
> **- ज्ञानेश्वर मुळे,** संमेलनाध्यक्ष

सकाळ

# मनासारखे शिकायला मिळणार : पांडे

**पिंपरी, ता. ८ :** "आपणाला जे शिकावेसे वाटते, ते शिकायला मिळणार आहे, याबाबतचा विचार हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात करण्यात आला आहे," असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे यांनी व्यक्त केले.

जागतिक मराठी अकादमी आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ यांच्यातर्फे पिंपरीतील विद्यापीठाच्या सभागृहात आयोजित १८ व्या जागतिक मराठी संमेलनात 'सरस्वतीच्या मंदिरात' या विषयावरील परिसंवादात ते बोलत होते. ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ डॉ. जगन्नाथ पाटील, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, माधवी आमडेकर (लंडन), दिल्लीचे डॉ. नरेश बोडखे आदी सहभागी झाले होते.

पांडे म्हणाले, "भारत सर्वाधिक युवा असल्याने देशाचे भविष्य उज्ज्वल आहे. युवकांना जगात जाण्याची संधी मिळेल. पण आव्हानेही असतील, सध्याच्या शिक्षणाचा कितपत उपयोग होतोय, याचा विचार केला पाहिजे. त्यादृष्टीने नवीन शैक्षणिक धोरणात बदल केल्याचा अभ्यास करून धोरण ठरवावे. शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. देशात येणाऱ्या परदेशातील विद्यापीठांचाही फायदा होईल."

आमडेकर म्हणाले, "अभ्यास किंवा शिक्षणात स्मरणशक्तीची खूप गरज आहे. माहिती, आत्मसात करून त्याचे रुपांतर ज्ञानात करणे आवश्यक आहे, याबाबत माहिती देणारे अभ्यासक्रम तयार केले आहेत. त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे." भाषा शिकणे अवघड नाही, पण, भाषेला महत्त्व आहे. यामुळे समानता येऊ शकते. कौशल्य विकास आणि तांत्रिक शिक्षण हे मातृभाषेत दिले पाहिजे. कारण, शालेय शिक्षणात भाषा शिकणे महत्त्वाचे आहे. याचा नवीन धोरणात विचार करावा लागणार आहे, असे मत डॉ. बोडखे यांनी व्यक्त केले. सचिन ईटकर आणि मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

## ऑनलाइन शिक्षणाला प्राधान्य हवे : पवार

■ कुलगुरु डॉ. एन. जे. पवार म्हणाले, "आगामी काळाती गरज लक्षात घेऊन युवा शक्तिला सबळ करण्याची गरज आहे. आपल्याकडे गुणवत्ता आहे, संशोधनाची मानसिकता आहे. पण, अर्थिक पाठबळ देण्याची आवश्यकता आहे. याचा विचार नवीन धोरणात केला आहे. संशोधनासाठी आवश्यक सोयीसुविधा दिल्या पाहिजेत. तसेच ऑनलाईन शिक्षण पद्धतीला प्राधान्य द्यावे. कारण त्यामुळे शिक्षणाची व्याप्ती वाढणार आहे."

## शैक्षणिक कर्ज सुविधा असावी : पाटील

■ डॉ. जगन्नाथ पाटील म्हणाले, "आपला देश हा विश्वगुरु होता, पण, मध्यंतरी मागे पडला. आता येणाऱ्या काळात संधी आहे. आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ आहे. त्यामुळे नजिकच्या काळात देश शिक्षण क्षेत्रात तिसऱ्या क्रमांकावर येऊ शकेल. त्यासाठी आपली गुणवत्ता अधिक प्रमाणावर वाढविणे आवश्यक आहे. तसेच मोफत शिक्षण न देता शैक्षणिक कर्जाची सुविधा दिल्या पाहिजेत."

## प्रेक्षकांच्या प्रेमामुळेच यश : तरडे

■ मराठी चित्रपट रसिकांचे प्रेम आणि पाठिंब्यामुळेच माझ्या चित्रपटांना यश मिळाले, अशी कृतज्ञता अभिनेते दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी व्यक्त केली. जागतिक मराठी संमेलनात 'देऊळबंद ते सरसेनापती हंबीरराव : एक प्रवास' या विषयावर ते बोलत होते. विनोद सातव यांनी त्यांच्याशी संवाद साधला. अभिनेते देव गिल उपस्थित होते. तरडे यांनी महाविद्यालयीन जीवनातून सुरू झालेला रंगमंचावरील प्रवास, चित्रपटाची निर्मिती, प्रेक्षकांनी वेळोवेळी दिलेला पाठिंबा आणि चित्रपट निर्मितीमध्ये आलेल्या अडचणी सांगत प्रवास उलगडला. 'देऊळबंद', 'मुळशी पॅटर्न' आणि 'सरसेनापती हंबीरराव' या चित्रपटांची वाटचाल अतिशय रंजकपणे मांडली. चित्रपटांच्या बरोबरीने मालिकांसाठी स्वतंत्र लेखनही केले.

## सांस्कृतिक वारशाचे संचित गोव्यात : गावडे

■ कला अकादमीच्या माध्यमातून नाट्यप्रयोगी पंढरी समजले जाणारे गोवा, तसेच राष्ट्रीय चित्रपट महोत्सव या माध्यमातून देशाचा सांस्कृतिक वारसा जपण्याचे काम गोवा राज्य करत असल्याबद्दल अभिमान असल्याचे मत गोवा राज्याचे सांस्कृतिक मंत्री गोविंद गावडे यांनी व्यक्त केले. 'माझ्या गोव्याच्या भूमीत' या विषयावरील परिसंवादात ते बोलत होते. माजी केंद्रीय मंत्री रमाकांत खलप, पत्रकार सागर जावडेकर सहभागी झाले होते.

पुढारी




जागतिक मराठी अकादमी आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ पिंपरी येथे आयोजित १८ व्या जागतिक मराठी संमेलनात स्वागताध्यक्ष तथा डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते राज ठाकरे यांचा सत्कार करण्यात आला.

# केवळ गुजरातला प्राधान्य देऊ नये

## मोदींबाबत राज ठाकरेंची अपेक्षा; एखादा प्रकल्प गेल्याने फरक नाही

**पिंपरी : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्रातून एखाद-दुसरा उद्योग राज्याबाहेर गेल्याने मोठा फरक पडणार नाही. सध्या आहेत ते उद्योग टिकविले तरी महाराष्ट्र खूप पुढे राहील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व राज्यांकडे एकसमान लक्ष द्यायला हवे. त्यांनी गुजराती असल्याने केवळ गुजरातला प्राधान्य देऊ नये, असे परखड मत राज ठाकरे यांनी रविवारी व्यक्त केले.

जागतिक मराठी अकादमी आणि पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय १८ वे जागतिक मराठी संमेलन झाले. पिंपरी येथील संत तुकारामनगर येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. त्या प्रसंगी ठाकरे यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवरही सडेतोड भाष्य केले.

'व्यंग, वास्तव आणि राजकारण' या विषयावर ठाकरे यांची मुलाखत प्रकाश अकोलकर आणि प्रभाकर वाईरकर यांनी घेतली. स्वागताध्यक्ष तथा डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते ठाकरे यांचा सत्कार करण्यात आला.

### राजकारणाची परिस्थिती उद्विग्न करणारी

महाराष्ट्राच्या राजकारणाची एकूण परिस्थिती उद्विग्न करणारी असल्याने मी महिने-दोन महिने राजकारणावर बोलतच नाही. नारायण राणे किंवा संजय राऊत एकमेकांवर काय टीका करतात, याच्याशी लोकांना काय देणघेणं आहे. त्यामुळे मी राजकीय परिस्थितीवर बोलणे टाळतो. परिणामी मी अनेक दिवस राजकारणाबाबत बोलतच नाही. पण मग शरद पवार बोलतात, राज ठाकरे मध्येच येतात आणि बोलतात, अशी मिश्कील टिप्पणी मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी केली.

### चांगल्या कामाला चांगले म्हणा

२०१४ नंतर देशात जी राजकीय स्थित्यंतरे झाली, त्यातल्या अनेक गोष्टी मला पटल्या नाहीत. त्यामुळे 'लाव रे तो व्हिडिओ'ची भूमिका घेतली होती. मात्र परिस्थितीनुसार बदल होत असतात. अडीच ते तीन वर्षांपूर्वी एकमेकांवर टीका करणारे विरोधक सत्तेसाठी मांडीला मांडी लावून कसे बसतात, असा प्रश्न ठाकरे यांनी उपस्थित केला. नरेंद्र मोदी हे पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी सर्वात आधी उत्तर प्रदेश, बिहार अणि झारखंडकडे लक्ष द्यावे, असे मी म्हणालो होतो. पंतप्रधानांनी जम्मू-काश्मीरमधील रद्द केलेले ३७० कलम, राम मंदिर हे विषय मार्गी लावले. चांगले काम होत असेल तर त्याला चांगले म्हटले पाहिजे, अशी भूमिकाही ठाकरे यांनी मांडली.

### कलाकृतीसाठी सराव महत्त्वाचा

वडील श्रीकांत ठाकरे आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी व्यंगचित्रे शिकविली. कोणत्याही कलाकृतीसाठी सराव हा महत्त्वाचा भाग असतो. सोशल मीडियापेक्षा वृत्तपत्रात व्यंगचित्र छापून येण्याची मजा वेगळीच असते. कल्पना, चित्र आणि शब्दांद्वारे केलेले व्यंग हे व्यंगचित्रात असायला हवे, असे मत ठाकरे यांनी व्यक्त केले.

> सध्याचे राजकारण हे तिटकारा आणणारे, उद्विग्न करणारे आहे. जाती-धर्मामध्ये तेढ निर्माण करणे आणि महापुरुषांवरून राजकारण करणे हे अयोग्य आहे. राजकारणात केवळ पैसा असून भागत नाही; तर माणसांची मनेही जिंकावी लागतात. बुद्धिवादी आणि विचारवंतांनी राजकारणात पुढे येणे गरजेचे आहे.
>
> **- राज ठाकरे**, मनसेप्रमुख

पुढारी ANCHOR

Pimpri Edition
Jan 9, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

सकाळ

## राज ठाकरे यांची अपेक्षा : 'शोध मराठी मनाचा' जागतिक मराठी संमेलन

# मोदींनी सर्व राज्यांकडे समान लक्ष द्यावे

**पिंपरी, ता. ८ :** "देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व राज्यांकडे सारखे लक्ष द्यावे. पंतप्रधान गुजराती म्हणून फक्त गुजरातकडे लक्ष देणे बरोबर नाही. माजी पंतप्रधान मनमोहनसिंग पंजाबचे होते, म्हणून त्यांनी पंजाबकडेच लक्ष दिले तर असे कसे चालणार. पंतप्रधान सर्व राज्ये माझी आहेत, असे समजून विचार करणारे हवेत," असे मत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष व व्यंग्यचित्रकार राज ठाकरे यांनी पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ प्रेक्षागृहात रविवारी (ता. ८) व्यक्त केले.

जागतिक मराठी अकादमी आणि पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ आयोजित 'शोध मराठी मनाचा' जागतिक मराठी संमेलन २०२३ मधील 'व्यंग, वास्तव आणि राजकारण' या विषयावरील परिसंवादात व्यंग्यचित्रकार राज ठाकरे यांची मुलाखत संवादक ज्येष्ठ पत्रकार प्रकाश अकोलकर, व्यंग्यचित्रकार प्रभाकर वाईरकर यांनी घेतली. ठाकरे म्हणाले,

> सध्या सुडाच्या राजकारणापेक्षा बडबडण्याचे राजकारण जास्त आहे. भविष्यात राजकारणात येणारे तरुण याकडे बघून काय म्हणणार, असे बडबडायचे राजकारण आपण करायचे का ? चॅनेलवर दिवसभर जी 'पकपक' दाखविली जाते, ती दाखवून आपण येणाऱ्या पिढ्या बरबाद करीत आहोत. हिंदीत जे दाखवितात तेच आपण मराठीत दाखविण्याचा प्रयत्न करतोय. मराठी भाषा ही शुद्ध यायला हवी, ती येत नसेल तर सुधारून घ्या. राज्याच्या विविध भागांत भाषेचा लहेजा वेगवेगळा आहे. विदर्भातून चॅनेलमध्ये आलेल्या पत्रकाराच्या भाषेत हिंदी शब्द येणार.
>
> **- राज ठाकरे,** अध्यक्ष, नवनिर्माण सेना

"वडील व बाळासाहेबांनी मला कार्टून शिकविले. व्यंग्यचित्र ही चित्रकलेची शेवटची पायरी आहे. कलाकृती सुचली अन् ती काढता न येणे हा कलाकाराचा पराभव आहे. व्यंग्यचित्रात सराव हा महत्त्वाचा भाग आहे. ब्रिटनचे प्रख्यात व्यंग्यचित्रकार डेव्हिड लो यांच्या व्यंग्यचित्रांचा माझ्यावर प्रभाव होता. सोशल मीडियापेक्षा वर्तमानपत्रात व्यंग्यचित्र येण्याची मजा वेगळीच आहे."

विचार करणाऱ्या माणसांनी राजकारणात आले पाहिजे. बुद्धिवादी वर्ग राजकारणाकडे तुच्छतेने पाहतो. आता पैशांचा खेळ चालू आहे. यावर काय करायचे, असा प्रश्न विचारल्यावर राज ठाकरे म्हणाले, "राजकारणात पैसे लागतात हे खरे आहे. पण लोकांची मनेही जिंकावी लागतात ना ? समाजकारणातही काम करणारे अनेक लोक आहेत. परंतु ते जे काम करतात, त्याला राजकीय धार आल्याशिवाय ते प्रश्न सुटणार नाहीत. राजकारण काही लोकांनी खराब केले असेल तर तुम्ही ते सुधारावे. तुमची तशी इच्छा असेल तर मी तुमच्याबरोबर आहे." वाईरकर यांनी पाच मिनिटांत व्यासपीठावर राज ठाकरे यांचे व्यंग्यचित्र रेखाटले. संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील, अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर मुळे, अकादमीचे अध्यक्ष रामदास फुटाणे, सचिन इटकर यांनी अकोलकर व वाईरकर यांचा सत्कार केला.




**डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी : जागतिक मराठी संमेलनातील परिसंवादात संवाद साधताना राज ठाकरे. या वेळी प्रकाश अकोलकर व प्रभाकर वाईरकर.**

### 'ती' दोन व्यक्तिमत्त्वं डोक्यात फिट

बाळासाहेब ठाकरे व शरद पवार यांचे नाव घेतल्याशिवाय राजकारण करता येत नाही, याकडे तुम्ही कसे बघता, असे विचारल्यावर ठाकरे म्हणाले, "या दोन्ही नेत्यांनी खूप मोठा काळ पाहिला. डोक्यात जुन्या चित्रपटांची कथा जशा फिट होत्या, तशी ही दोन व्यक्तिमत्त्व डोक्यात अजूनही फिट आहेत."

पुढारी

# विद्यार्थीभिमूख शिक्षणाचा राष्ट्रीय धोरणात विचार

## राजेश पांडे यांचे प्रतिपादन




**पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ प्रेक्षागृहात आयोजित १८ व्या जागतिक मराठी संमेलनातील 'सरस्वतीच्या मंदिरात' या परिसंवादात चर्चा करताना (डावीकडून) सचिन इटकर, डॉ. नरेश बोडके, राजेश पांडे, कुलगुरू एन. जे. पवार, माधवी आमडेकर, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. जगन्नाथ पाटील, मिलिंद कुलकर्णी.**

**पिंपरी : पुढारी वृत्तसेवा**

आपणाला जे शिकावेसे वाटते ते शिकायला मिळणार आहे. शिक्षण विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरावे, याचा विचार नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात करण्यात आला आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे यांनी केले.

१८ व्या जागतिक मराठी संमेलनातील 'सरस्वतीच्या मंदिरात' या परिसंवादाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. जगन्नाथ पाटील, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. एन. जे. पवार, माधवी आमडेकर (लंडन), दिल्लीचे डॉ. नरेश बोडखे आदी सहभागी झाले होते. सचिन इटकर आणि मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

पांडे म्हणाले की, देशातील युवकांना जगात जाण्याची मिळणारी संधी हे एक आव्हान असणार आहे. त्याचा साकल्याने विचार केला पाहिजे. सध्याच्या शिक्षणाचा कितपत उपयोग होतो आहे, याचा विचार केला पाहिजे. त्यादृष्टीने नवीन शैक्षणिक धोरणात बदल करावे. जी मुले शिक्षणापासून दूर आहेत, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केला आहे. परदेशातील विद्यापीठे आपल्या देशात येत असल्याने त्याचा फायदा होईल. कुलगुरु पवार म्हणाले की, देशातील युवा शक्तीला सबळ करण्याची गरज आहे. आपल्याकडे गुणवत्ता आहे. संशोधन करण्याची मानसिकता आहे. त्याला अर्थिक पाठबळ देण्याची गरज आहे. त्याचा नवीन शैक्षणिक धोरणात विचार करण्यात आला आहे.डॉ. जगन्नाथ पाटील म्हणाले की, आपला देश हा विश्वगुरु होता. मात्र, मध्यंतरी त्याची पीछेहाट झाली. येणार्या काळात आपल्याला संधी आहे. आपल्याकडे मोठया प्रमाणावर मनुष्यबळ आहे. त्यामुळे नजीकच्या काळात देश शिक्षणक्षेत्रात तिसर्या क्रमांकावर येऊ शकेल. त्यासाठी आपली गुणवत्ता अधिक प्रमाणावर वाढविणे गरजेचे आहे.

आमडेकर यांनी सांगितले की, अभ्यास किवा शिक्षणात स्मरणशक्तीची खूप गरज आहे. माहिती आत्मसात करून त्याचे रुपांतर ज्ञानात करणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती देणारे अभ्यासक्रम तयार केले आहेत. त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

### भाषेमुळे समानता येऊ शकते

डॉ. नरेश बोडखे म्हणाले की, भाषा शिकणे अवघड नाही कारण भाषेचे महत्व आहे. त्यामुळे समानता येऊ शकते. तसेच कौशल्य विकास आणि तांत्रिक शिक्षण हे मातृभाषेत दिले पाहिजे. कारण, शालेय शिक्षणात भाषा शिकणे महत्वाचे आहे. त्याचा नवीन धोरणात विचार करावा लागणार आहे.

My Pimpri Edition
Jan 9, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

लोकमत

राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार

# मराठी ज्ञान, विज्ञान, शास्त्र भाषा व्हावी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** मराठी भाषेला मोठी परंपरा आहे. मराठी ही ज्ञानाची भाषा व्हावी, विज्ञान आणि शास्त्र भाषा व्हावी, व्यापाराची भाषा व्हावी, असे मत राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी रविवारी पिंपरीत व्यक्त केले.

पिंपरी-चिंचवड शहरात जागतिक मराठी अकादमी आणि डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ यांच्या वतीने शोध मराठी मनाचा या १८व्या जागतिक मराठी संमेलनातील सांगता समारंभात मुनगंटीवार बोलत होते. व्यासपीठावर पालकमंत्री चंद्रकांत पाटील, संमेलनाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर मुळे, स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील, अकादमीचे अध्यक्ष रामदास फुटाणे, माजी केंद्रीय मंत्री रमाकांत खलप, गोव्याचे सांस्कृतिक मंत्री गोविंद गावडे आणि डॉ. सोमनाथ पाटील, डॉ. यशराज पाटील उपस्थित होते.



भाषेचा आनंद देणारे हे संमेलन आहे. जागतिक पातळीवर मराठी ही भाषा दसनंबरी आहे. म-मराठीचा, म-महाराष्ट्राचा आणि म-महाराजांचा अशी समृद्ध भाषा आहे. जगातील अनेक भाषा या संपुष्टात येत आहेत. मात्र, मराठी समृद्ध होत आहे. जात, धर्म पंथ, वंश, उच्च, नीच असे भेद न करण्याची संस्कृती आपल्याकडे आहे. त्यामुळेच मराठीचे पाऊल पुढेच पडते आहे. स्टोरी टेल आहे आता महाराष्ट्र टेलची गरज आहे.

**- सुधीर मुनगंटीवार**



'मराठी माणूस कसा पुढे जाईल, यासाठी सरकारकडून प्रयत्न केले जात आहेत. यूपीएससीमध्ये मराठीचा टक्का वाढविण्यासाठी सहा आयएएस पूर्व प्रशिक्षण केंद्र निर्माण करण्याचे धोरण स्वीकारले जात आहे. तसेच मराठीचा टक्का वाढविण्यासाठी आपण मानसिकता बदलायला हवी. जीवनात प्रगती आणि नोकरी आणि इतर गोष्टींची संधी सोडू नये. आपल्या मनातील भीती आणि न्यूनगंड कमी करायला हवा. आलेली संधी सोडू नये. त्यातून मराठी आणि मराठी माणूस देशात नव्हे तर जगातही आणखी पुढे जाईल.

**- चंद्रकांत पाटील**

### संमेलनातील मागण्या

अध्यक्ष मुळे यांनी संमेलनाचा समारोप करताना पाच मागण्या सरकारसमोर ठेवल्या. त्यात दिल्लीतील मराठी भाषकांकडे आणि संस्थांकडे दुर्लक्ष होत आहे. मराठीची परंपरा जपणाऱ्या संस्थांना बळ द्यावे, भारतातील विविध भागात असणाऱ्या मराठी वैभवाच्या ठिकाणांवर संशोधन व्हावे.

इतिहास आणि इतिहासकारांची सूची तयार करावी. तिथे माहितीफलक असावेत. तसेच मराठी संवर्धनासाठी थिंक टँक निर्माण करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत, अशा मागण्या केल्या.

# जागतिक मराठी संमेलनात हृदयस्पर्शी कवितांचे सादरीकरण

**पिंपरी : पुढारी वृत्तसेवा**

राज्यभरातून आलेल्या कवींनी सादर केलेल्या हृदयस्पर्शी व वास्तवाला भिडणाऱ्या कविता, प्रसिद्ध महिला चित्रकार व शिल्पकारांनी हुबेहूब सादर केलेल्या कलेच्या आविष्काराचे सप्तरंग शनिवारी (दि. ८) रसिकांना लुभावून गेले.

निमित्त होते जागतिक मराठी अकादमी व डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (पिंपरी) आयोजित १८ व्या जागतिक मराठी संमेलनात सादर झालेल्या 'चित्र- शिल्प- काव्य' या कार्यक्रमाचे. तब्बल साडेतीन तास चाललेल्या या कार्यक्रमाला रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रसिद्ध कवी व जागतिक मराठी अकादमीचे




**पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या प्रेक्षागृहात शनिवारी आयोजित कार्यक्रमात चित्र-शिल्प-काव्य कार्यक्रमात सहभागी कवी, चित्रकार आणि शिल्पकार.**

अध्यक्ष फ. मु. शिंदे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रसिद्ध हास्यकवी अशोक नायगावकर, महेश केळुसकर, श्रीकांत कदम यांनी सूत्रधार म्हणून भूमिका बजावली. संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी पाटील यांनी सर्व कवींचा तसेच चित्रकार व शिल्पकारांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला. सुरभी गुळवेलकर या मुलीने अशोक नायगावकर यांचे समोर बसून काढलेले चित्र, हर्षदा कोळपकर यांनी काढलेले रचनाचित्र तर शिल्पकार सुप्रिया शिंदे यांनी ज्येष्ठ पत्रकार रजनीश राणे यांचे समोर बसवून निर्माण केलेले शिल्प हे कार्यक्रमाचा परमोच्च बिंदू ठरले. कवी प्रशांत मोरे यांच्या रचनेने काव्य मैफिलीला सुरुवात झाली. त्यानंतर इंद्रजीत घुले यांच्या 'लग्नातलं जेवण' या कवितेने हास्यरंग विखुरले. लता अहिवळे यांच्या 'बाप' या कवितेने रसिकांच्या डोळ्यात अश्रू तरळले. भरत दौंडकर यांनी 'अंदाज येत नाही' ही कविता सादर केली. नारायण पुरी यांच्या 'जांगडगुत्ता' या कवितेने वन्समोअर घेतला. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू एन. जे. पवार, संमेलनाचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर मुळे, अशोक नायगावकर, फ. मु. शिंदे यांनीही कविता सादर केल्या.

लोकमत

# एखाद-दुसरा उद्योग बाहेर गेल्याने फार नुकसान नाही

## राज ठाकरे : राज्यकर्ता मोठ्या मनाचा हवा, तो कधीच व्यापारी नसावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महाराष्ट्र राज्य सर्वार्थाने श्रीमंत आहे. त्यामुळे एखाद-दुसरा उद्योग बाहेर गेल्याने फार नुकसान होणार नाही. 'दर्या में खसखस' असा हा प्रकार आहे. आपण गुजरातचे आहोत म्हणून त्याच भागाला प्राधान्य देणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शोभत नाही. राज्यकर्ता मोठ्या मनाचा असावा. तो कधीच व्यापारी नसावा. व्यापारी त्याच्या हाताखाली असावा, असे परखड मत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख आणि प्रसिद्ध व्यंगचित्रकार राज ठाकरे यांनी व्यक्त केले.

पिंपरी-चिंचवड शहरात आयोजित 'शोध मराठी मनाचा' या १८ व्या जागतिक मराठी संमेलनात ते बोलत होते. त्यांची प्रकट मुलाखत ज्येष्ठ व्यंगत्रिकार प्रभाकर वाईरकर आणि ज्येष्ठ पत्रकार प्रकाश अकोलकर यांनी घेतली. त्यात ठाकरे यांनी व्यंगचित्रकला, तिचे भवितव्य, मुस्कटदाबी, सध्याचे राजकारण, बेरोजगारी यावर परखड मते मांडली. स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील आणि यशराज पाटील यांनी ठाकरे यांचा सत्कार केला.




'शोध मराठी मनाचा' या १८ व्या जागतिक मराठी संमेलनात राज ठाकरे यांची प्रकट मुलाखत ज्येष्ठ पत्रकार प्रकाश अकोलकर यांनी घेतली.

### ...त्यामुळे मी बोलत नाही

ठाकरे म्हणाले, कोणीही काहीही बोलले की न्यूज चॅनेल हे दाखवायलाच बसले आहेत. महाराष्ट्रात एवढे प्रश्न आहेत तरी कोण काय बोलले, हेच सुरू आहे. मी काहीही बोलत नाही. ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणतात, मी मध्येच येतो आणि बोलतो त्याला ही कारणे आहेत. यामुळेच मी बोलतच नाही. जेव्हा दाखवणे बंद होईल. तेव्हा सर्वांची तोंडे आपोआपच बंद होतील.

### खाली आग लागलीय अन्...

बेरोजगारीच्या प्रश्नावर ठाकरे म्हणाले, शहरात कोणत्या नोकऱ्या आहेत. हे तरुणांना कळायला हवे. हेच सरकारचे काम आहे. मराठी संमेलन भरविण्याची गरज आहे. इथे खाली आग लागलीय आणि आपण जागतिक, विश्व संमेलन कसे भरवितो?. नोकऱ्या कुठे कुठे आहेत. हे तरुणांना सरकारने सांगायला हवे.

### बडबड करण्याचे राजकारण

राज ठाकरे म्हणाले, "सध्या राज्यात बडबड करण्याचे राजकारण सुरू आहे. राजकारणात येऊ पाहणारी पिढी याकडे गंभीरपणे पाहत आहे. रोज सकाळपासून वृत्तवाहिन्यांवर पकपक सुरू होते. यातून नवीन पिढ्या काय आदर्श घेणार? हे पाहून राजकारणात यायचे की नाही, याबाबत नवी पिढी संभ्रमात आहे."

### राजकीय स्थिती लयाला गेली

ठाकरे म्हणाले, "२०१४ मध्ये म्हटले होते की, नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले तर त्यांनी पहिली पाच वर्षे उत्तर प्रदेश, बिहार आणि झारखंडकडे लक्ष द्यावे. एखाद्या भूमिकेला विरोध करणे राजकारणात काही गैर नाही; पण, त्या माणसाने चांगली गोष्ट केली तर त्याचे अभिनंदन करण्यात मोठेपणा आणि मोकळेपणाही असावा लागतो. आजची राजकीय स्थिती खूपच लयाला गेली आहे. सधा सुरू असलेले राजकारण नव्हे. जाती-जातींमध्ये तेढ निर्माण करणे, महापुरुषांबद्दल बोलणे, कोणी कशावरही बोलायला लागले. कोणीही इतिहासतज्ज्ञ होत आहेत.'

### प्रत्येक राज्य समान असावे

राज्यघटनेने संघ राज्याची चौकट तयार केली आहे. देशातील एकाच विशिष्ट राज्याला प्राधान्य देणे हे चुकीचे नाही का? यावर ठाकरे म्हणाले की, हे मी आधीच बोललो आहे. तेव्हा सगळ्यांनी माना आत घातल्या होत्या. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाकडे लक्ष दिले पाहिजे. देशातील प्रत्येक राज्य हे त्यांच्यासाठी मुलासारखे समान असले पाहिजे. आपण स्वत: गुजराती आहोत म्हणून गुजरातला प्राधान्य देणे, हे पंतप्रधानपदाला शोभत नाही.